पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक ०६/०७/२०१९

## दराची पोलीस नक्षल चकमकीत ठार नक्षलवादयाच्या मृतदेहाचे अवशेष जप्त

दिनांक २७/०५/२०१९ रोजी सकाळी ०९.०० ते १०.०० वा.च्या सुमारास गडचिरोली पोलीस दलातील सी-६० व विशेष कृती दलांचे जवान नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना उप विभाग धानोरा अंतर्गत येणाऱ्या पोलीस मदत केंद्र कटेझरी हद्दीतील मौजा दराची येथील जंगल परिसरात दबा धरून बसलेल्या नक्षलवादयांनी सी-६० व विशेष कृती दलाचे जवानांना जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांचेवर गोळीबार केला होता. त्यामुळे सी-६० व विशेष कृती दलाचे जवानांनी स्वसंरक्षणार्थ व प्रतिउत्त्रादाखल गोळीबार केला होता. तेव्हा पोलीसांचा वाढता दबाव पाहुन नक्षलवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला. सदर घटनेनंतर परिसराची पाहणी केली असता १ नग १२ बोअर रायफल, ७ नग यु.बी.जी.एल, ३ नग वॉकी टॉकी, १ नग सॅमसंग कंपनीचा टॅब, १ नग मोबाईल चॉर्जर, नक्षल पुस्तके, असे मोठया प्रमाणावर नक्षल साहित्य मिळुन आले दिसत्या परिस्थितीवरून बरेच नक्षलवादी सदर चकमकीत गंभीर जखमी झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन आले होते.

सदर चकमकीत मयत झालेला नक्षलवादी नामे शामराव उर्फ मुकेश पांडू गोटा रा. पिपलीबुर्गी ता. एटापल्ली जिल्हा गडचिरोली याचा मृतदेह त्याचे नक्षल साथीदारांनी दराची जंगल परिसरात जाळल्याबाबत गोपनिय माहीती मिळाली. मिळालेल्या गोपनिय माहीती वरून पोलीस पथकांने सदर ठिकाणी जावुन पाहणी केली असता जळालेल्या मृतदेहाचे अवशेष दिसुन आले. सदर ठिकाणावरिल मृत देहाचे अवशेष नायब तहसिलदार धानोरा यांचे समक्ष पुढील कार्यवाहीसाठी जप्त करण्यात आले आहेत. तसेच सदर मृत नक्षलवादीचे आई-वडील यांनी शामराव याच्या मृतदेहाची राख त्यांना नक्षलवादयांनी घरी आणुन दिल्याचे सांगितले असुन त्यांनी आपल्या मुलाची तेरवी केल्याचे स्पष्ट केले आहे. यामुळे मौजा दराची जंगल परिसरातील चकमकीत नक्षलवादी शामराव गोटा हा ठार झाल्याच्या घटनेला पुष्टी मिळाली आहे.

